I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 211-213
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# वरोरा तालुक्यातील एकात्मिक बाल विकास योजने अंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची भूमिका

**स्मिता विनायकराव पांढरे**
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
*Corresponding Author :- pandhare.smita@gmail.com

Communicated : 30.01.2023 | Revision : 07.03.2023 Accepted : 05.04.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**
या संशोधनातून आपणास वरोरा तालूक्यातील 'एकात्मिक बाल विकास योजने' अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची भूमिका या बद्दल वर्णन केले आहेत. देशाच्या ग्रामीण भागात खेड्यांमध्ये बालविकासाच्या सामुहिक कार्यक्रम राबविण्याचे ठरविले व त्यासाठी ''एकात्मिक बालविकास योजना'' अमलात आणली. लहान मुलांच्या सर्वांगीण विकास व पोषण आहाराकडे विशेष काळजीने लक्ष देण्याकरीता अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची नेमणूक करण्यात आली. पंचवार्षिक योजने अंतर्गत शासनाने माता व बालसंगोपणाचे महत्वाचे कार्य अमलात आणले व त्यासाठी बालवाड्य, अंगणवाड्य उघडण्यात आल्या. त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या अंगणवाडी सेविकांना, लहान मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी त्यांना प्रशिक्षण देऊन सेवेत रुजू करण्यात आले.

**मुख्यशब्द** :.वरोरा बालविकास योजना सर्वांगीण विकास प्रशिक्षण

## प्रस्तांवना :

१९ व्या शतकापासून आपल्या भारत देशात अंगणवाडी शिक्षणाची सुरूवात झाली. लहान मुलांकरिता खेडे भागत अंगण परिसरात चालविली जाणारी अभ्यासकेंद्र म्हणजे 'अंगणवाडी' एकात्मिक बाल विकास योजना म्हणजेच (आय.सी.डी.एस) हा एक प्रकारचा अंगणवाडी उपक्रम म्हणूनही ओळखला जातो.

शासनाने भारताच्या ग्रामीण व मागासलेल्या भागात खेडयांमध्ये बाल विकासाचा सामुहिक कार्यक्रम राबविण्याची ठरविले व त्यासाठी 'एकात्मिक बाल विकास योजना' अमलात आणली. हि योजना २ ऑक्टोंबर १९७५ पासून सुरू करण्यात आली. ग्रामीण तसेच मागासलेल्या भागात अज्ञानता, अंधश्रध्दा असल्यामुळे शासनाने लहान मुलांच्या अज्ञानता, शारिरीक, मानसिक, सामाजिक विकास म्हणजेच त्यांचा सर्वांगीण विकास व पोषण आहारकडे विशेष काळजीपूर्वक लक्ष देण्याकरिता अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांची नेमणूक करण्यात आली.

## एकात्मिक बालविकास योजना (आय.सी.डी.एस) :

एकात्मिक बाल विकास योजना हा उपक्रम देशातील केंद्रशासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालय विभागाव्दारे राबविण्यात येणारा, भारत देशातील सर्वात मोठा व बहुउद्देशीय उपक्रम आहे. ही योजना लहान मुलांच्या प्रारंभिक बाल्यवस्थेतील निगा, काळजी, आहार तसेच सर्वांगीण विकासाकरिता एका चांगली योजना आहे. या योजनेमध्ये ग्रामीण भागातील, मागासलेल्या क्षेत्रातील, शहरी तसेच आदिवासी क्षेत्रात राहणारा सहा वर्षापेक्षा कमी वयोगटातील लहान मुलांच्या सर्वांगीण विकासाकरीता तसेच गर्भवती, स्तनदामाता, यांच्याकरिता पोषण आहार, आरोग्य निगा आणि पूर्व प्राथमिक शिक्षण ई. यासारख्या महत्त्वाच्या सेवा पुरविल्या जातात.

## एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत प्रमुख सेवा :–

एकात्मिक बाल विकास योजने अंतर्गत गरीब लाभार्थीना काही सेवा दिल्या जातात. त्या सेवा पुढिल प्रमाणे आहेत:–

- पुरक व पोषण आहार

- वेळोवेळी लसीकरण
- नियमित आरोग्य तपासणी
- संदर्भ आरोग्य सेवा
- अनौपचारिक शाला–पूर्व शिक्षण (पूर्व प्राथमिक शिक्षण)
- १५ ते ४५ वर्षे वयोगटातील महिलांना पोषण तसेच आरोग्य शिक्षण देणे.

**अंगणवाडी म्हणजे काय ? :–**

मराठी भाषांमध्ये 'अंगणवाडी' या शब्दाचा अर्थ 'अंगणामधील निवारा' असा आहे. थोडक्यात, ग्रामीण भागात अंगणपरिसरात चालवली जाणारी माहिती केंद्र म्हणजे अंगणवाडी. एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत भारत सरकारने ''अंगणवाडी'' ग्रामीण, मागासलेल्या, शहरी झोपडपट्ट्यमध्ये १९७५ पासून सुरू केल्या व त्याचा हेतू बालंकामधील कुपोषणाशी लढणे हा होता.

पंचवार्षिक योजनेअंतर्गत शासनाने माता व बाल संगोपणाचे महत्वाचे कार्य अमलात आणले व त्याकरिता बालवाडी, अंगणवाडी उघण्यात आल्या. त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या अंगणवाडी सेविकांना व मदतनीसांना, लहान मुलांचा सर्वागीण विकास व्हावा यासाठी त्यांना प्रशिक्षण देऊन सेवेत घेण्यात आले.

भारतात एकूण १३.७८ लाख अंगणवाडी असनू महाराष्ट्र राज्यात १,०८,००५ अंगणवाड्य आहेत तसेच मिनी अंगणवाडी केंद्र कार्यान्वित आहेत. आय.सी.डी.एस. प्रकल्प महाराष्ट्र राज्यात ५५० पेक्षा जास्त चालू आहेत, ज्यामध्ये १२.८ लाख अंगणवाडी सेविका व ११.६ लाख अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत.

व्होरा तालुक्यातील एकात्मिक बाल विकास योजने अंतर्गत एकूण २१० अंगणवाडी आहेत, त्यात २०४ मोठ्या अंगणवाडी तसेच ०६ मिनी अंगणवाडी आहेत.

**अंगणवाडीचे उद्दिष्टे :–**

१) ० – ६ वर्षे वयोगटातील मुलांचा पोषक आहार विषयक व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे.

२) मुलांचा सर्वांगीण विकासासाठी पाया घालणे.

३) बालमृत्यू, मुलांचा रोगटपणा व कुपोषण, तसेच शाळेतील लहान मुलांचा गळतीचा प्रमाण कमी करणे.

४) बालविकासास चालना मिळावी म्हणून विविध खात्यांमध्ये धोरण व अंमलबजावणी या बाबत प्रभावी समन्वय घडवून आणणे.

**अंगणवाडीचीकार्ये:–**

''एकात्मिक बाल विकास योजना'' अंतर्गत अंगणवाडी हे सर्व आरोग्य, पोषण आणि शिक्षण विषयक योजनांचे मध्यवर्ती केंद्र आहे. पुढिल सेवा अंगणवाडी सेविका लाभार्थीना उपलब्ध करुन देतात :–

१) आरोग्य तपासणी

२) गरोदर महिलांचे धनुर्वात विरोधी लसीकरण

३) संदर्भ सेवा

४) पुरक पोषण आहार

५) पोषण आणि आरोग्य शिक्षण

**निष्कर्ष :–**

एकात्मिक बाल विकास योजना (आय.सी.डी.एस) व्दारे चालविण्यात येणारे 'अंगणवाडी' समाजावर आधारीत योजना आहे. हि योजनेव्दारे लहानमुलांचा सर्वांगीण विकास व पोषण आहार या करिता अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना नेमणूक करण्यात येते. २००५–०६ पासून लोकसंख्या दर प्रत्येक ५००–१५०० वस्तीत एक अंगणवाडी केंद्र खेडे, आदिवासी व शहरी मागासलेल्या भागात असावी अशी योजना शासनाने तयार केली.

**संदर्भ:**

खोबे, २००५ महिला व बाल कल्याण विभाग, चंद्रपूर, अंगणवाडी मार्गदर्शिका व पुर्व शालेय शिक्षण अभ्यासक्रम पुस्तिका

शेटे, २००५ एकात्मिक बाल विकास सेवा योजना, ग्रामीण प्रकल्प, चंद्रपूर योजनेचे माहिती पत्रक

अंगणवाडी सेवीका प्रशिक्षण पुस्तिका—सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

महाराष्ट्र राज्य, एकात्मिक बाल विकास योजना, मार्गदर्शिका २००२—०३.